ePaper

**भल्या पहाटे नागपूरसह विदर्भाला भूकंपाचे धक्के, 5.3 रिश्टर स्केलची नोंद**



|| वर्ष - 8 | अंक -146 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 04 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- सूर्या-शिवम आणि शार्दुल चमकले
- यशस्वी अडकला काचेच्या दारात
- श्रद्धा कपूरने भाड्याने घेतलं अपार्टमेंट
- दक्षिण कोरियात आणीबाणी जाहीर

## आझाद मैदानावर उद्या भव्य सोहळा

# ‘लाडक्या बहिणीं’च्या साक्षीने शपथविधी!

### पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह शेतकरी, साधुसंतांना निमंत्रण

। मुंबई ।महाईन्यूज

**राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार सत्तेवर विराजमान होण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ‘लाडक्या बहिणीं’च्या साक्षीने नव्या सरकारचा गुरूवारी शपथविधी सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सर्व राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीही ठेवण्यात आली आहे.**





महायुती सरकारचा शपथविधी येत्या ५ डिसेंबर रोजी आझाद मैदानात पार पडणार आहे. त्यासाठी भव्य व्यासपीठ उभारण्यात आले असून, त्यावर पहिल्या रांगेत पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांची आसन व्यवस्था असेल. तर मागे एका बाजूला मंत्री, तर दुसऱ्या बाजूला काही अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची व्यवस्था करण्यात येणार आहे. तर समोर सुमारे २५ हजार लोकांच्या बैठकीची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेष म्हणजे महायुतीला सत्तेवर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महिलांसाठी शपथविधीच्या ठिकाणी ‘लाडकी बहीण कक्ष’ उभारण्यात येणार असून, तेथे १० हजार महिलांची व्यवस्था केली जाणार आहे.

### ‘एक है तो सेफ है’चे कक्ष

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपने ‘एक है तो सेफ है’चा नारा दिला होता. आता शपथविधी सोहळ्यातही ‘एक है तो सेफ है’चा नारा दिसणार असून, त्यासाठी खास कक्ष निर्माण करण्यात आला आहे. याठिकाणी ‘एक है तो सेफ है’, अशा आशयाचे मजकूर असलेले टी-शर्ट परिधान करून महायुतीचे कार्यकर्ते बसणार आहेत. तसेच शेतकरी, संविधान असे आणखी दोन कक्ष निर्माण करण्यात आले आहेत.

### पंतप्रधानांसह गृहमंत्री, अन्य केंद्रीय मंत्री निमंत्रित

राज्यातील महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले यांच्यासह अन्य केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री तसेच राज्यातील सर्वपक्षीय प्रमुख नेत्यांना देखील सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच विविध ठिकाणचे धर्मगुरू, साधुसंतही उपस्थित राहणार आहेत. शपथविधीपूर्वी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### आझाद मैदान परिसरात 5 हजार पोलीस तैनात राहणार

शपथविधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर मैदान परिसरासह मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणी कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात ठेवण्यात येणार आहे. सुमारे ५ हजार पोलीस आझाद मैदान परिसरात तैनात राहणार असून त्यामध्ये जवळपास चार ते साडेचार हजार पोलीस अंमलदारांचा समावेश असेल. तसेच, २ दंगल नियंत्रण पथक, बॉम्बशोधक व नाशक पथकेही असणार आहेत. महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी आझाद मैदानात एकूण तीन व्यासपीठ उभारण्यात येणार आहेत.

मुख्य व्यासपीठावर पंतप्रधानांसह मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच इतर दोन व्यासपीठांवर लोकप्रतिनिधी व विविध क्षेत्रातील मान्यवर असतील. सर्व मान्यवरांच्या (व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी) आगमन मार्गांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. या मार्गांवर पोलीस अधिकारी, गृहरक्षक दल, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक तैनात असतील. तसेच या मार्गांवर वाहतूक पोलीसही तैनात असणार आहेत. त्यामध्ये सुमारे १४४ वाहतूक पोलीस अधिकारी आणि १ हजार पोलीस अंमलदारांचा समावेश असेल. तसेच, मुंबईतील मुख्य रस्त्यांवर साध्या वेशातील पोलीस अधिकारीही तैनात असतील, अशी माहिती सूत्रांनी व अधिकाऱ्यांनी दिली.

### महापालिकाही सज्ज

आझाद मैदानावर गुरुवारी होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी मुंबई महापालिका प्रशासनानेही तयारी केली आहे. आझाद मैदान राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे. परंतु पालिकेनेही या शपथविधीसाठी सेवा-सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

आझाद मैदानाच्या आजूबाजूच्या रस्त्यांची डागडुजी, वाहतूक चिन्हे व रेषा यांची रंगरंगोटी, दुभाजकांची रंगरंगोटी, पाणीपुरवठा, शौचालये आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच मैदान परिसरातील झाडांच्या वाढलेल्या फांद्याच्या छाटणीचे काम होती घेण्यात आले आहे.

मैदानातील कचरा आणि राडारोडा हटवणे, अतिक्रमण निर्मूलन आदी कामांना वेग आला असल्याची माहिती पालिकेच्या ‘अ’ विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिली. तसेच वाहतूक पोलिसांच्या सूचनांनुसार या भागात सोयी-सुविधा देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# डेंग्यू, हिवतापासाठी 59 रुपयांत विमा!

## देशातील सर्वांत मोठ्या वित्ततंत्रज्ञान कंपनीची योजना

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील आघाडीची वित्ततंत्रज्ञान कंपनी फोनपेने तिच्या मंचावर फक्त ५९ रुपयांपासून सुरू होणारी नवीन डेंग्यू आणि हिवताप विमा योजना सुरू करण्याची घोषणा केली. ही किफायतशीर आरोग्य संरक्षण योजना कीटकजन्य आणि वायूप्रदूषणाशी निगडित आहे.**



वैद्यकीय खर्चासाठी १ लाखांपर्यंतचे सर्वसमावेशक वार्षिक विमा संरक्षण ग्राहकाला मिळेल. या विमा संरक्षणामुळे विशेषत: छोट्या व मध्यम शहरांमध्ये वर्षभर अशा आजारांमुळे होणाऱ्या अनपेक्षित वैद्यकीय खर्चापासून ग्राहक आर्थिकदृष्ट्या संरक्षित राहतील. ही योजना फोनपे ग्राहकांना हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या, फायलेरियासिस, जपानी विषमज्वर, स्वाइन फ्लू, बर्ड फ्लू, घटसर्प, फुफ्फुसीय क्षयरोग आणि मेंदूज्वर यासह १० पेक्षा जास्त आजारांविरुद्ध सर्वसमावेशक विमा संरक्षण देते. ग्राहकांना विमा संरक्षणामध्ये रुग्णालयीन उपचाराचा खर्च, रोगांचे निदान आणि अतिदक्षता विभागातील उपचार आदी बाबींचा समावेश आहे. इतर हंगामी योजनांप्रमाणे या योजनेचे संरक्षण केवळ पावसाळ्यापुरते मर्यादित नाही. फोनपे ग्राहकांना वर्षभर हे विमा संरक्षण मिळेल. याव्यतिरिक्त, विमाधारक हे शंभर टक्के डिजिटल दाव्यांच्या प्रक्रियेसह फोनपे उपयोजनाद्वारे त्वरित खरेदी, नियोजन आणि दावे दाखल करू शकतात, तसेच जलद दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अवलंबण्यात येणार आहे.या योजनेबद्दल माहिती देताना, फोनपे इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल गुप्ता म्हणाले की, फोनपेद्वारे, आम्ही सर्वांना सुलभ आणि परवडणारी विमा सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहोत. या योजनेतून आमच्या ग्राहकांना वर्षभर सर्वसमावेशक संरक्षण प्रदान करण्याच्या आमचा उद्देश आहे. याद्वारे, दर्जेदार सेवेतील आर्थिक अडथळे दूर करून आरोग्यविषयक धोके प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी आमच्या ग्राहकांना सक्षम करण्याचे आमचे ध्येय आहे.

डिजिटल वितरणातील आमच्या कौशल्याचा फायदा घेऊन, देशभरातील वंचित लोकांना अनुरूप विमा उपाय प्रदान करणे हे आमचे ध्येय आहे. या योजनेत वैद्यकीय खर्चासाठी १ लाखांपर्यंतचे सर्वसमावेशक वार्षिक विमा संरक्षण ग्राहकाला मिळेल. या विमा संरक्षणामुळे विशेषत: छोट्या व मध्यम शहरांमध्ये वर्षभर अशा आजारांमुळे होणाऱ्या अनपेक्षित वैद्यकीय खर्चापासून ग्राहक आर्थिकदृष्ट्या संरक्षित राहतील. ही योजना फोनपे ग्राहकांना हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या, फायलेरियासिस, जपानी विषमज्वर, स्वाइन फ्लू, बर्ड फ्लू, घटसर्प, फुफ्फुसीय क्षयरोग आणि मेंदूज्वर यासह १० पेक्षा जास्त आजारांविरुद्ध सर्वसमावेशक विमा संरक्षण देते. ग्राहकांना विमा संरक्षणामध्ये रुग्णालयीन उपचाराचा खर्च, रोगांचे निदान आणि अतिदक्षता विभागातील उपचार आदी बाबींचा समावेश आहे. इतर हंगामी योजनांप्रमाणे या योजनेचे संरक्षण केवळ पावसाळ्यापुरते मर्यादित नाही. फोनपे ग्राहकांना वर्षभर हे विमा संरक्षण मिळेल. याव्यतिरिक्त, विमाधारक हे शंभर टक्के डिजिटल दाव्यांच्या प्रक्रियेसह फोनपे उपयोजनाद्वारे त्वरित खरेदी, नियोजन आणि दावे दाखल करू शकतात, तसेच जलद दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अवलंबण्यात येणार आहे.या योजनेबद्दल माहिती देताना, फोनपे इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल गुप्ता म्हणाले की, फोनपेद्वारे, आम्ही सर्वांना सुलभ आणि परवडणारी विमा सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहोत.

### ग्राहकांना वर्षभर सर्वसमावेशक संरक्षण

या योजनेतून आमच्या ग्राहकांना वर्षभर सर्वसमावेशक संरक्षण प्रदान करण्याच्या आमचा उद्देश आहे. आरोग्यविषयक धोके प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी आमच्या ग्राहकांना सक्षम करण्याचे आमचे ध्येय आहे. डिजिटल वितरणातील आमच्या कौशल्याचा फायदा घेऊन, देशभरातील वंचित लोकांना अनुरूप विमा उपाय प्रदान करणे हे आमचे ध्येय आहे.

# चिंचवडमध्ये महाविकास आघाडीची वाट खडतर

## आगामी महापालिका निवडणुकीत अस्तित्व राखण्याचे आव्हान

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीत महायुतीने पिंपरी-चिंचवडवरील पकड पुन्हा घट्ट केली. दोन भाजपचे, तर एक राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचा उमेदवार विजयी झाला. शहरातील तिन्ही जागा लढविणाऱ्या राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे पानिपत झाले. तिन्ही उमेदवारांचा दारुण पराभव झाला आहे.**



त्यामुळे शहरातील महाविकास आघाडीची वाटचाल खडतर झाली असून, आव्हाने वाढली आहेत. आगामी महापालिका निवडणुकीत अस्तित्व राखण्यासाठी नेत्यांचा कस लागणार आहे. महायुतीने लोकसभेनंतर लगेच विधानसभेची तयारी सुरू केली. 'ज्या पक्षाचा, विद्यमान आमदार, त्या पक्षाला जागा' या सूत्रानुसार पिंपरी राष्ट्रवादी (अजित पवार), चिंचवड, भोसरी भाजपकडे कायम राहण्याचे निश्चित केले. त्यानुसार पक्षातील अंतर्गत नाराजी दूर करून उमेदवारांना प्रचार करण्यास सांगितले. दुसरीकडे, अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत महाविकास आघाडीत कोणता मतदारसंघ कोणत्या पक्षाला याचा घोळ सुरू होता. महाविकास आघाडीचे उमेदवार निश्चित होईपर्यंत महायुतीच्या उमेदवारांची प्रचाराची एक फेरी पूर्ण झाली होती. परिणामी, शहरातील राजकीय परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही. पिंपरीतून राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे अण्णा बनसोडे, भोसरीतून भाजपचे महेश लांडगे पुन्हा विजयी झाले, तर चिंचवडमधून भाजपचेच शंकर जगताप लाखाच्या मताधिक्याने निवडून आले. पिंपरी, भोसरीत प्रस्थापितांविरोधात काहीशी नाराजी जाणवत होती. पक्षफुटीनंतर लोकसभा निवडणुकीवेळी शरद पवार यांना मिळालेली सहानुभूती आताही मिळेल असे महाविकास आघाडीकडून सांगितले जात होते.

### महाविकास आघाडीसमोर आव्हान

महायुतीच्या तिन्ही उमेदवारांनी दणदणीत विजय मिळविला. महायुतीने शहरातील वर्चस्व सिद्ध केल्यानंतर आता महापालिका निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता होती. सत्तेतील बलाढ्य भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार), शिवसेना (शिंदे) या तीन पक्षांचा सामना करणे महाविकास आघाडीसमोर मोठे आव्हान असेल. पिंपरी आणि चिंचवडमधील बहुतांश माजी नगरसेवक अजित पवार यांच्यासोबत आहेत. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची या दोन मतदारसंघातील ताकत नगण्य आहे.

## सहयोगनगर-तळवडेत वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी

# उभारणार मोनोपोल..!

### पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थायी समितीची मंजुरी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**तळवडेतील सहयोगनगर येथील वाहतुकीच्या रस्त्यामध्ये 40 वर्षांपासून असलेला टॉवर अखेर हटविण्यात येणार आहे. त्याजागी मोनोपोल उभारण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र निविदेला महानगरपालिका स्थायी समिती सभेत मंजुरी देण्यात आली.**





मोनोपोल कमी जागेत उभारल्याने सहयोगनगर ते त्रिवेणीनगर दरम्यान होणारी वाहतूक कोंडी सुटणार आहे. परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे. यासाठी भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

महापालिकेच्या 'फ' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत तळवडे प्रभाग क्रमांक 12 मधील सहयोगनगर येथे वाहतुकीच्या रस्त्यामध्ये महापारेषणाचा अतिउच्च दाबाचा टॉवर सुमारे 40 वर्षांपासून कार्यरत आहे. तळवडे ही औद्योगिक वसाहत तसेच आयटी पार्क असल्यामुळे लोकवस्ती व वाहतूक कोंडी येथे मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. टॉवरवरील वीजवाहिनी ही 220 केव्ही एचव्ही या क्षमतेची आहे. या मनो-याच्या खालून धोकादायक पद्धतीने वाहतूक सुरु आहे.

दरम्यान, महापारेषण कंपनीने हा रस्ता बंद करण्याबाबत वारंवार कळविले. परंतु, हा रस्ता वाहतुकीचा असून तांत्रिक कारणांमुळे बंद करणे शक्य नसल्याचे स्थापत्य विभागाने कळविले आहे. हा मनोरा स्थलांतर करुन रस्त्याच्या दोन्ही कडेला वाहतूक सुरळीत करण्याकरिता सद्यस्थितीत असलेला मनोरा (9.5 – 9.5 ) 50 मीटर पुढे किंवा मागे मोनोपोलद्वारे (3-3 मीटर) करावा. त्याप्रमाणे आवश्यक असलेला मनोका क्रमांक 33 ही स्थलांतरित करण्याची आवश्यकता आहे. ज्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस (3-3 मीटर) वाहतुकीस जागा उपलब्ध करण्याचा पर्याय समोर आला होता.

> तळवडे- रुपीनगर भागातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. टॉवरमुळे सहयोगनगर ते त्रिवेणीनगर दरम्यान मोठी वाहतूक कोंडी होत होती. टॉवर खालून नागरिकांना ये-जा करावी लागत होती. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे टॉवर काढण्यासाठी आम्ही आग्रही मागणी केली. त्याला आमदार महेश लांडगे यांचे पाठबळ मिळाले. आता टॉवर काढून मोनोपोलची कमी जागेत उभारणी केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.
>
> – **शांताराम भालेकर,** माजी नगरसेवक.

माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे नवीन मोनोपोल उभारणीची मागणी होती.

तसेच, भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. आमदार लांडगे यांनी प्रशासनाला कार्यवाही करण्याची सूचना केली होती. त्यानंतर प्रशासनाने कार्यवाही केली आणि या विषयाला मंजुरी दिली आहे.

टॉवर काढण्यात येणार आहे. त्याजागी मोनोपोलची कमी जागेत उभारणी केली जाणार आहे. स्थायी समितीच्या बैठकीत या निविदेला मंजुरी देण्यात आली. लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल.

---

## डॉ. सुलक्षणा शिलवंत यांनी मानले मतदारांचे आभार..!

### आभार मेळावा : पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते, मतदार मोठ्या संख्येने उपस्थित

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या अधिकृत उमेदवार डॉ. सुलक्षणा शिलवंत यांच्यातर्फे (दि.२) हॉटेल रागा पॅलेस या ठिकाणी आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक मान्यवर, महाविकास आघाडीतील घटक पक्षातील मित्र पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते, मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अनेक मान्यवरांची भाषणे झाली.**



माजी आमदार ॲड.गौतम चाबुकस्वार म्हणाले आजपर्यंत मी २४ निवडणुका पाहिल्या, परंतु "विधानसभा २०२४" निवडणूक म्हणजे लोकशाहीची हत्या झाली असं म्हणावं लागेल. पोस्टल मतदानामध्ये महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांना लीड आहे. म्हणूनच ईव्हीएम मशीनने आपल्याला हरवले आहे अन्यथा आपण जिंकलो आहोत. जनतेला गुलाम बनवून ठेवण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. गुलामीच्या विरोधात लढलेल्या पुरोगामी नेत्यांची नाव घ्यायची आज आम्हाला लाज वाटत आहे. आपण फुले शाहू आंबेडकरांचे विचार अजूनही आत्मसात केलेले नाहीत. लोकशाहीचे चारही स्तंभ नष्ट करण्याचे काम या ठिकाणी चालले आहे.जोपर्यंत बॅलेट पेपर वरती निवडणूक होणार नाहीत तोपर्यंत महाविकासाकडे तर्फे आंदोलन केले जाईल आणि देशाला आदर्श घालून दिला जाईल.

#### डॉ. सुलक्षणा शिलवंत भावूक..

यशाचे भागीदार फार असतात, परंतु अपयशाला वाली नसतो. परंतु आपण सर्वजण सोबत आहात त्यामुळे शिलवंत परिवाराला सदैव आपल्या ऋणात राहायला आवडेल अशा आशयाचे दिवंगत वडिलांचे पत्र वाचताना डॉ. सुलक्षणा भावूक झाल्या होत्या व त्यांना अश्रू अनावर झाले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे म्हणाले की, एवढ्या सगळ्या संकटाच्या काळामध्ये इतक्या राजकीय संघर्षांनी घेरलेले असताना आपण विधानसभेसाठी उमेदवार म्हणून समोर आलात त्याबद्दल सर्वांच्या वतीने डॉ. सुलक्षणा शीलवंत यांचे आभार मानतो.



## भूमिका

# बाबांच्या सच्चा अनुयायांना सलाम !

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे विद्वान होते. त्यामुळे त्यांनी मनात आणलं असतं तर ते जगातले सर्वात श्रीमंत व्यक्ती झाले असते किंवा जर त्यांनी त्यावेळेस काँग्रसशी हातमिळवणी करून राजकारण केलं असतं तर ते देशाच्या अत्युच्च पदावर विराजमान झाले असते.**

मात्र अस्पृश्य, शोषित, पीडित, बहुजन समाज आणि स्त्रियांना कोणतेही माणुसकीचे हक्क मिळाले नसते. या सर्वांना आपलं जीवन गुलामीतच जगावं लागलं असतं. त्याला ना शिक्षण, ना अधिकार, ना नोकरी, ना सन्मान, ना पद मिळाल असतं. मात्र या महापुरुषाचे हृदय करुणामय होते. त्यांना आपल्या या शोषित पीडित अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाची हीनदीन अवस्था पाहवल्या गेली नाही. त्यामुळे त्यांनी आपल्या विद्वत्तेचा उपयोग समाजाला गुलामीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी, त्यांच्या उत्थानासाठी करण्याचा निर्धार करून समाजाच्या मुक्तिचा व मानवी हक्काचा संघर्ष उभा केला. कारण महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आपल्या समाजावर स्वतःच्या कुटुंबापेक्षाही जास्त प्रेम होतं. त्यामुळे त्यांनी स्वतःचा संसार जाळून समाजाच्या संसारात उजेड निर्माण केला. समाजातील सर्व लोकांचे जीवन प्रकाशमान केलं.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षात जाज्वल्य स्वाभिमान आणि असीम त्याग होता. म्हणूनच त्यांनी न भूतो न भविष्यती अशी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धम्मीक व सांस्कृतिक क्रांती केली. त्यांच्या या संघर्षाला काही मोजके स्वार्थी आणि बेईमान लोकं सोडले तर संपूर्ण समाजाची साथ होती. कारण अडाणी असूनही त्यावेळी समाजाला या महापुरुषाच्या संघर्षाची आणि त्यागाची जाणीव होती. आपल्या सर्वस्वाचा त्याग करून हा महापुरुष केवळ समाजाच्या हक्कांसाठी, त्यांची गुलामी नष्ट करण्यासाठी लढतो आहे याची त्यांना समज होती. त्यामुळे हा समाज त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा होता. म्हणून त्यावेळेस समाज जरी गरीब होता तरी चळवळ मात्र श्रीमंत होती. सत्तालोलूप झाले असून पदासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी बेईमान करून फक्त आपलं आणि कुटुंबाचच भलं करण्यात गुंतले आहेत. त्यामुळे आमच्या सर्वच चळवळी गटातटात विभागल्या गेल्या आहेत. परिणामी समाजाची नेत्यांविषयी निष्ठा कमी होत चालली असून आमची सामाजिक व राजकीय शक्ती क्षीण होत चालली आहे.१३ ऑक्टोंबर, १९३५ रोजी नाशिक जिल्ह्याच्या येवले येथील सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, “मी अस्पृश्य म्हणून हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.” तर मी धर्मांतर करणार अशी भीमगर्जना केली आणि आपल्या समाजाला निक्षून सांगितले की, जर तुम्हाला माणूस म्हणून सन्मानाने जगायचं असेल तर तुम्ही धर्मांतर केलच पाहिजे. धर्मांतर केल्याशिवाय अस्पृश्य समाजाला त्यांच्यावर लादलेल्या सामाजिक व धार्मिक गुलामीतून मुक्ती मिळणार नाही. समाजात धर्मांतराची गरज आणि त्याची पार्श्वभूमी समजावून सांगण्यासाठी आणि समाजाला गुलामीतून मुक्त करण्यासाठी उभा केलेला संघर्ष अधिक गतिमान व्हावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विविध ठिकाणी सभा घेऊन समाजाचे प्रबोधन करावे लागत असे. असेच एकदा सन १९३८ साली बार्शी येथील भिम नगर मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सभा आयोजित करण्यात आली होती. आजूबाजूच्या परिसरातील अनेक आबालवृद्ध, युवक, नागरिक बाबासाहेबांचे विचार ऐकण्यासाठी जमा झाले होते. काही वेळाने अचानक दगडांचा मारा सुरु झाला. पूर्ण जमाव जिवाच्या आकांताने सैरावैरा पळू लागला. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मंचावरून हटले नाहीत. हल्लेखोर आता मंचावर जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दगाफटका करणार असं दिसताच विनायक कांबळे आणि त्यांची पत्नी कोंडाबाई कांबळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जमावाच्या मध्ये छातीचा कोट करून उभे राहिले. या दांपत्याच्या हातात काठ्या होत्या. त्या दोघांनी अशी काही लाठीकाठी फिरवायला सुरुवात केली की, येणारा प्रत्येक दगड हा काठीने परत येणाऱ्या दिशेकडे जातं असे. अशा या निष्ठावंत असलेल्या आणि आपल्या नेत्याच्या जीवाला दगाफटका होऊ नये म्हणून स्वतःचा जीव धोक्यात घालून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संरक्षण करणाऱ्या कोंडाबाई कांबळे आजबार्शी जिल्हा सोलापूर येथे राहतात.

## प्रासंगिक »

### निंदकाचे घर

***आपल्यात काय कसब आहे हे आपल्याला माहीत असतं. ते कसब आपण कितपत साध्य करू शकतो याचा अंदाज आपल्याला स्वतः बांधता येत नाही.***

जेंव्हा एखाद्या कार्याचा प्रारंभ आपण करतो तेंव्हा त्यासाठी जीव की प्राण ओतून आपण काम करतो त्यानंतरच त्यातील गांभीर्य आपणास कळत असते. आपल्यातील समार्थ्याचाही अंदाज आपल्याला येतो. त्यानंतर येणाऱ्या अडचणी आणि समस्यांवर मात करण्यासाठी आपण तयार झालेलो असतो. यादरम्यान त्याच कामावर एखाद्याने बोट उचलले किंवा अविश्वास दाखविला की मात्र आपल्याला त्रास होतो. या अविश्वासामुळे दोन प्रकारच्या गोष्टी घडतात. खरं तर नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीला डावी - उजवी बाजू असते. खरी - खोटी आणि चांगली - वाईट अशीही असते. एखादे वेळी अविश्वास दाखवला तर आपण मनातून खचून जातो. आपल्याला त्याच कार्यातून घडताना बघणारी माणसं जेंव्हा त्याच आपल्या कार्यावर अविश्वासाने त्यांचा दृष्टिकोन बनवितात तेंव्हा त्या कामातला आपला रस कमी होतो.

आपल्या भारत देशात सर्वात श्रीमंत आणि प्रशिध्द मंदिर म्हणून आंध्रप्रदेश राज्यातील तिरुपती बालाजी या मंदिराचे नाव नावाजलेल आहे. खर तर तिरुपती बालाजी तीरुमल्ला येथे दर्शन घेतल्यावर बालाजी भक्त वाशीम येथील बालाजी मंदिरात दर्शन घेतात व नंतर देऊळगावराजा येथील बालाजीचे दर्शन घेतात.

# बुलडाणा येथील ब्रम्होत्सव सोहळा!

जे बालाजी भक्त आंध्रप्रदेश राज्यातील तिरुपती बालाजीचे दर्शन घेवू शकत नाहीत असे भक्त वाशीम आणि देऊळगावराजा येथील बालाजीचे दर्शन घेतात. अशी आख्यायिका आहे कि, बुलडाणा जिल्हयातील देऊळगावराजा येथे विजया दशमीला निघणार असलेल्या पालखी महोत्सवात साक्षात बालाजी भगवान तिरुपती देवस्थान सोडून काही तासांसाठी गावाजवळ असलेल्या आमना नदीतील ठाण्यावर येतात आणि भाविकांना दर्शन देवून परत तिरुपतीला जातात.जीवन जगतांना माणसाने ईश्वरावर श्रद्धा ठेवायला हवी. श्रद्धेने माणसाला विश्वास मिळतो. श्रद्धेने माणसाला बळ मिळते. प्रत्येक कामात श्रद्धा असायलाच हवी. जीवन जगतांना माणसाने कधीही कोणाच्या श्रद्धेचा अनादर करू नये.बुलडाणा हे १८६७ सालापासून जिल्हा मुख्यालयाचा दर्जा असणारे एक शहर आहे. निसर्गाच्या अलंकाराने सुशोभीत केलेले हे गाव समुद्रसपाटीपासून २१९० फुट उंचावर वसलेले आहे. विदर्भातील चिखलदरा



गावाच्या खालोखाल थंड हवेचे ठिकाण म्हणून एके काळी भिल्लढाणा म्हणून ओळख मिळविलेले गाव आज भिल्लढाणा या गावाच्या नावाचा अपभ्रंश होऊन याचे बुलडाणा हे नाव पडले. कर्नल बिडोज टेलर हे डेप्युटी कमिशनर असतांना त्यांनी बुलडाण्याचे वर्णन करतांना म्हटले होते कि, “सुंदर अशा खोल दर्यांनी युक्त असलेला चित्रमय सौंदर्य लाभलेले गाव.” बुलडाणा शहराच्या आध्यात्मिक आणि धार्मिक वैभवात भर टाकणारे राजूर घाटातील व्यंकटगिरीवरील पर्वतावर निसर्गसौंदर्याच्या कुशीत वसलेल्या बालाजी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील ब्रह्मोत्सव रंगणार आहे. विषेश म्हणजे यंदाचा उत्सव हा तपपूर्ती सोहळा आहे. बालाजी मंदिर प्राणप्रतिष्ठेला यंदा १४ वर्षे पूर्ण झाले आहेत. त्यामुळे ब्रह्मोत्सवाचा हा उत्सव म्हणजे त्रयोदशतम सोहळा साजरा केला जात आहे. ५, ६, ७ व ८ डिसेंबर रोजी हा उत्सव होणार आहे. बालाजी मंदिरावर दरवर्षी ब्रह्मोत्सव साजरा केला जातो. भक्तीमय वातावरणात चार दिवस चालणाऱ्या सोहळ्याला आणि शेवटच्या दिवशी महाप्रसादसाठी भाविकांची मोठी गर्दी असते. बालाजी मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेला यंदा १४ वर्षे पूर्ण होत आहेत त्यामुळे यावर्षी त्रयोदशतम सोहळा साजरा केला जाणार आहे.राबालाजी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ डिसेंबर पासून या ब्रह्मोत्सव उत्सवाची सुरुवात होणार असून ८ डिसेंबर रोजी सांगता होणार आहे. बालाजी सेवा समिती आणि बालाजी मंदिर संस्थांच्या वतीने या ब्रह्मोत्सवाची जय्यत तयारी केली जात आहे. तीन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच भजन संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महायुतीत मंत्रिपदावरून रस्सीखेच!

## शिंदेसेनेएवढी मंत्रिपदे आम्हाला द्या: अजित पवार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महायुतीत शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत मंत्रिपदावरून रस्सीखेच सुरु असल्याचं बोललं जात आहे. एकनाथ शिंदे हे गृहमंत्री पदासाठी आग्रही आहेत, तर गृहमंत्री पद सोडण्यासं भाजपा तयार नाही. यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडूनही शिंदेंच्या बरोबरीने आम्हालाही मंत्रिपदे देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात 'स्ट्राईक रेटनुसार आम्ही दोन नंबरवर आहोत. त्यामुळे आम्हालाही त्यांच्या (शिंदेंच्या) बरोबरीने मंत्रिपदे द्या, एवढीच आमची मागणी आहे', असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या मागणीमुळे महायुतीत मंत्रिपदावरून रस्सीखेच सुरु आहे का? याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत.**



स्ट्राईक रेटनुसार आमच्यात दोन आणि तीन नंबरमध्ये थोडासा फरक आहे. त्यामुळे आमचं म्हणणं आहे की आमचा देखील स्ट्राईक रेट चांगला आहे. मग तुम्ही आम्हाला (अजित पवारांच्या राष्ट्रवादीला) त्यांच्या (शिंदेंच्या शिवसेनेच्या) बरोबरीने मंत्रिपदे द्या, एवढी आमची मागणी आहे. यावर आता जे काय आहे ते सर्व नेते बसून निर्णय घेतील. कदाचित आम्हाला (शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार) सारख्या जागा देतील किंवा एखादी जागा कमी जास्त होईल, असं छगन भुजबळ यांनी म्हटलं.विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन करण्यासाठी नेत्यांमध्ये हालचाली सुरु आहेत. ५ डिसेंबर रोजी नव्या सरकारचा शपथविधी सोहळा पार पडणार असल्याचंही सांगितलं जात आहे. मात्र, हे सर्व सुरु असताना विधानसभेचा निकाल लागून आठ दिवस झाले तरी अद्याप सरकार स्थापन न झाल्यामुळे महायुतीत सर्व काही अलबेल नसल्याची चर्चा आहे. यातच महायुतीत शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत मंत्रिमदावरून रस्सीखेच सुरु असल्याचं बोललं जात आहे. तसेच एकनाथ शिंदे हे गृहमंत्री पदासाठी आग्रही आहेत, तर गृहमंत्री पद सोडण्यास भाजपा तयार नसल्याचं सांगितलं जात आहे.

या पार्श्वभूमीवर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांची दिल्लीत गृहमंत्री अमित शाह यांच्याबरोबर बैठक देखील पार पडली होती. मात्र, या बैठकीनंतरही महायुतीमधील तिढा सुटला नाही अशी चर्चा आहे. यातच एकनाथ शिंदे हे गेल्या दोन दिवसांपासून आजारी आहेत. तसेच त्यांनी रुग्णालयात दाखल होत उपचार घेतल्याचं सांगण्यात आलं. त्यानंतर आज एकनाथ शिंदे हे वर्षा या निवासस्थानी दाखल झाले. वर्षा निवासस्थानी दाखल झाल्यानंतर भाजपाचे नेते गिरीश महाजन यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: वर्षा निवासस्थानी जाऊन एकनाथ शिंदेंची भेट घेतली. या भेटीत एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये जवळपास आर्धा तास चर्चा झाली. त्यामुळे या भेटीत नेमकी काय चर्चा झाली? याचा तपसील अद्याप समोर आलेला नाही. मात्र, या भेटीनंतर तरी महायुतीतील तिढा सुटणार का? मंत्रिपदांचा आणि खातेवाटपाचा तिढा सुटणार का? याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे. दरम्यान, शिंदे आणि फडणवीसांच्या भेटीवरून शिंदे गटाचे प्रवक्ते किरण पावसकर यांनी प्रतिक्रिया देत फडणवीसांनी भेट का घेतली? याविषयी माहिती सांगितली आहे.

"एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. महायुतीमध्ये कधीही नाराजी नव्हती आणि नाही. नाराजीचा काही प्रश्न नाही. एकनाथ शिंदे यांची तब्येत व्यवस्थित नव्हती. त्यामुळे ते रुग्णालयात दाखल झाले होते. मात्र, माध्यमात चर्चा झाल्या की ते नाराज आहेत. महाराष्ट्रातील जनतेने भरभरून एवढं त्यांना मतदान केलं. तसं येणारा कार्यक्रम देखील मोठा व्हावा आणि त्यामध्ये शिवसेना देखील असणार आहे", असं किरण पावसकर यांनी म्हटलं.

देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांची आज वर्षा या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. या भेटीत दोघांमध्ये महायुतीच्या सरकार स्थापनेबाबत चर्चा सुरु असल्याचं बोललं जात आहे. मात्र, या भेटीसंदर्भात बोलताना किरण पावसकर यांनी म्हटलं की, "कोणत्याही मागण्यांसाठी महायुतीचं सरकार अडलेलं नाही. गिरीश महाजन यांनी देखील काही वेळापूर्वी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.

### कोणाला संधी दिली जाणार?

आता देवेंद्र फडणवीस हे एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी वर्षावर दाखल झाले आहेत", असं त्यांनी म्हटलं.किरण पावसकर यांनी पुढे म्हटलं की,"आमच्याकडून सांगण्यासारखी एक गोष्ट राहिली की, ज्या मंत्र्यांचं चारित्र्य चांगलं आहे. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप नाहीत. अशा लोकांनाच पुन्हा संधी द्यावी, अशी एक कल्पना समोर आलेली आहे", असं ते म्हणाले.महायुतीत शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत मंत्रिपदावरून रस्सीखेच सुरु असल्याचं बोललं जात आहे. एकनाथ शिंदे हे गृहमंत्री पदासाठी आग्रही आहेत, तर गृहमंत्री पद सोडण्यासं भाजपा तयार नाही. यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडूनही शिंदेंच्या बरोबरीने आम्हालाही मंत्रिपदे देण्याची मागणी केली आहे.

---

# ईव्हीएम मशीनमध्ये गडबड नाही!

## मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रियेबाबत दिली माहिती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी विधानसभा निवडणूक २०२४ च्या मतदान प्रक्रियेबाबत माहिती दिली आहे. यावेळी त्यांनी सांगितलं की ईव्हीएम मशीनमध्ये कोणीही गडबड करू शकत नाही.**

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने मोठं यश मिळवलं आहे. पाच महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात अपयशी ठरलेल्या महायुतीने विधानसभा निवडणुकीत मोठी मुसंडी मारत बहुमत मिळवलं आहे. या निवडणुकीत राज्यातील २८८ जागांपैकी ५० जागाही काँग्रेस, शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) व त्यांच्या मित्र पक्षांच्या महाविकास आघाडीला जिंकता आल्या नाहीत. तर महायुतीने तब्बल २३५ जागा जिंकल्या आहेत. हा निकाल पाहून सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केलं. तर, विरोधकांनी मतदान व मतमोजणीच्या प्रक्रियेवर ईव्हीएमवर संशय व्यक्त केला आहे. एस. चोकलिंगम म्हणाले, ईव्हीएमच्या विश्वासार्हतेबद्दल



दोन गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. तांत्रिकदृष्ट्या समजावून सांगायचं झाल्यास यामध्ये एकूण तीन भाग असतात. पहिलं कंट्रोल युनिट, दुसरं बॅलेट युनिट आणि तिसरा भाग म्हणजे व्हीव्हीपॅट मशीन. कंट्रोल युनिटमध्ये एक चिप असते. ज्यामध्ये एक ठराविक प्रोग्राम सेट करून ठेवलेला आहे. कोणीही तो प्रोग्राम बदलू शकत नाही.केवळ उमेदवाराचा नंबर आणि त्याला मिळालेली मते एवढ्याच गोष्टी साठवून ठेवलेल्या असतात.

### संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक

उदाहरणार्थ एक नंबरचं बटन मतदारांनी किती वेळा, दोन नंबरचं बटण किती वेळा दाबलं. तेवढीच माहिती त्यात साठवलेली असते. या मशीनला उमेदवाराचं नाव, त्याचं निवडणूक चिन्ह माहिती नसतं. परंतु, आपण ज्या उमेदवाराला मत दिलं आहे ते बरोबर आहे की नाही? ते मत त्यालाच मिळालं आहे की नाही हे तपासण्यासाठी व्हीव्हीपॅट मशीन असते. व्हीव्हीपॅट मशीन म्हणजेच व्होटर-व्हेरिफाइड पेपर ऑडिट ट्रेल मशीन, आपण ज्या उमेदवाराला मत दिलं आहे त्यालाच ते मिळालं आहे की नाही हे तपासण्यासाठी व्हीव्हीपॅट मशीन आणली आहे. यामध्ये उमेदवाराच्या निवडणूक चिन्हासह सर्व माहिती पाहता येते. फक्त व्हीव्हीपॅट मशीनवरच ही माहिती उपलब्ध असते.

# भारतीय पोलाद उद्योगाला झटका बसणार?

## अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेतली अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी विजय मिळवला आहे. या विजयानंतर येत्या जानेवारी महिन्यात २० तारखेला ट्रम्प अध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळणार आहेत. यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठ्या घोषणा करण्यास सुरूवात केली आहे. काही दिवसांपूर्वी भारतासह नऊ देशांचा समावेश असलेल्या 'ब्रिक्स' संघटनेला, अमेरिकन डॉलर कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्यास १०० टक्के आयात शुल्क लादण्यासह व्यापार बंद करण्याचा इशारा त्यांनी दिला होता. त्यानंतर आता ट्रम्प यांनी जगभरातील पोलाद उद्योगांची चिंता वाढवणारी घोषणा केली आहे.**



भारतीय पोलाद कंपन्यांच्या पोलाद निर्यात मोठ्या प्रमाणावर घसरली आहे. यातच अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी अमेरिकन पोलाद उद्योगांच्या रक्षणासाठी देशात आयात होणाऱ्या पोलादावर आणखी शुल्क वाढवण्याचे संकेत दिले आहेत. इतकेच नाही तर ट्रम्प यांनी जपानच्या निप्पॉन स्टील कंपनीला पेनसिल्वेनिया येथील पोलाद निर्मिती उद्योग यूएस स्टीलचे अधिगृहण करण्यापासून रोखणार असल्याचेही जाहीर केले आहे.अमेरिकेतील यूएस स्टील या स्थानिक पोलाद उद्योगाबद्द बोलताना ट्रम्प म्हणाले की, "कधीकाळीची महान आणि शक्तिशाली कंपनी यूएस स्टील, ही जपानच्या निप्पॉन स्टील या एका परदेशी कंपनीने विकत घ्यावी, याच्या मी पूर्णपणे विरोधात आहे. कर आणि शुल्कांमध्ये सूट देऊन आपण यूएस स्टील कंपनीला पुन्हा मजबूत आणि महान बनवूयात आणि हे अगदी वेगाने केले जाईल. राष्ट्राध्यक्ष म्हणून मी हा करार होण्यापासून थांबवेल. विकत घेणाऱ्यानी सावध व्हावे", अशी घोषणाच डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. भारतीय पोलाद उद्योग सध्या आव्हानांचा सामना करत आहे, अशातच डोनाल्ड ट्रम्प यांनी ही घोषणा केली आहे.

भारतीय पोलाद उद्योग सध्या निर्यातीमध्ये झालेली मोठी घट आणि देशात वाढलेली पोलादाची आयात या संकटांचा सामना करत आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत भारतातील पोलाद आयात ४१ टक्क्यांनी वाढली आहे, तर निर्यात ३६ टक्क्यांनी घटली आहे.यादरम्यान वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय तसेच पोलाद मंत्रालयाने पोलाद उद्योगाशी संबंधितांबरोबर सोमवारी एक बैठक घेतली, ज्यामध्ये पोलाद उद्योगाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये पोलाद उद्योगासमोरील आव्हाने लक्षात घेत मंत्रालयाने काही ठराविक पोलादी वस्तूंवर २५ टक्के सेफगार्ड ड्युटी लावण्याचा प्रस्ताव सादर केला.दरम्यान गेल्या महिन्यात पोलाद सचिव संदीप पौंड्रिक यांनी एका कार्यक्रमात सांगितले की, देशातील पोलादाचा वापर वाढत आहे, याबरोबरच त्यांनी पोलाद उत्पादकांचा नफा मात्र कमी-कमी होत असल्याचे नमूद केले. ते म्हणाले की, "२०२४-२५ च्या पहिल्या सहा महिन्यात पोलाद वापरामध्ये १३ टक्के वाढ दिसून आली आहे. मागणीमध्ये कुठलीही कमतरता नाही, सरकारकडून पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक खर्च होत राहिला आणि याबरोबर पोलाद वापरातील वाढ अशीच सुरू राहिली, तर २०२३ पर्यंत आपल्याला ३०० दशलक्ष टन क्षमतेची आवश्यकता भासेल", असे पौंड्रिक यावेळी म्हणाले.ते पुढे म्हणाले की, "पोलाद उत्पादनातील नफा हा मात्र चिंतेचा विषय आहे, विशेषतः गेल्या सहा महिन्यांमध्ये, जागतिक स्तरावर उत्पादन वाढल्याने स्टीलच्या किंमती खाली गेल्या आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यात भारतातील आयात ४१ टक्क्यांनी वाढली आहे, तर निर्यात ३६ टक्क्यांनी कमी झाली आहे. पोलाद कंपन्यांमधील साठा पातळी ही साधारणपणे १५-१६ दिवसांवरून वाढून ३० दिवसांपर्यंत गेली आहे. ही एक समस्या आहे आणि आम्हाला त्याची पूर्ण जाणीव आहे", असेही पौंड्रिक यावेळी म्हणाले. याबरोबरच त्यांनी स्थानिक पोलाद उद्योग वाचवण्यासाठीचे अनेक मार्ग असल्याचेही स्पष्ट केले. ज्यापैकी आयात शुल्क वाढवणे हा एक मार्ग असल्याचे पौंड्रिक म्हणाले.

### पोलादावर शुल्क वाढवण्याचे संकेत

अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी अमेरिकन पोलाद उद्योगांच्या रक्षणासाठी देशात आयात होणाऱ्या पोलादावर आणखी शुल्क वाढवण्याचे संकेत दिले आहेत. इतकेच नाही तर ट्रम्प यांनी जपानच्या निप्पॉन स्टील कंपनीला पेनसिल्वेनिया येथील पोलाद निर्मिती उद्योग यूएस स्टीलचे अधिगृहण करण्यापासून रोखणार असल्याचेही जाहीर केले आहे.अमेरिकेतील यूएस स्टील या स्थानिक पोलाद उद्योगाबद्द बोलताना ट्रम्प म्हणाले की, "कधीकाळीची महान आणि शक्तिशाली कंपनी यूएस स्टील, ही जपानच्या निप्पॉन स्टील या एका परदेशी कंपनीने विकत घ्यावी, याच्या मी पूर्णपणे विरोधात आहे. कर आणि शुल्कांमध्ये सूट देऊन आपण यूएस स्टील कंपनीला पुन्हा मजबूत आणि महान बनवूयात आणि हे अगदी वेगाने केले जाईल.

# दक्षिण कोरियात आणीबाणी जाहीर

## आणीबाणीचा निर्णय जाहीर करणं चुकीचं : हान डोंग हून

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण कोरियात आणीबाणी जाहीर झाली आहे. दक्षिण कोरियाचे राष्ट्रपती युक सुक येओल यांनी आणीबाणी जाहीर केली आहे. उत्तर कोरियातील कम्युनिस्ट शक्तींकडून निर्माण झालेल्या संकटांमुळे आम्ही दक्षिण कोरियाचं रक्षण करु इच्छितो त्यामुळेच मी आणीबाणी जाहीर करतो आहेत असं युक सुक येओल यांनी जाहीर केलं आहे.**




युक सुक येओल यांनी एका टेलिव्हिजन ब्रिफिंगमध्ये हे सांगितलं की आता आमच्यासमोर मार्शल लॉ चा आधार घेण्यावाचून काहीही उपाय उरलेला नाही. मार्शल लॉ अर्थात आणीबाणी जाहीर करताना येओल यांनी कशाकशावर बंदी असेल हे मात्र अद्याप स्पष्ट केलेलं नाही. तसंच दक्षिण कोरियात आणीबाणीच्या काळात कुठल्या नियमांची अंमलबजावणी केली जाईल हे देखील स्पष्ट केलेलं नाही. उत्तर कोरियातील कम्युनिस्ट शक्ती आणि देश विरोधी तत्त्वं संपवण्यासाठी आम्हाला हे पाऊल उचलावं लागतं आहे. हे पाऊल उचलणं अत्यंत गरजेचं होतं त्यामुळेच आम्ही आणीबाणीचा निर्णय घेतला आहे असं राष्ट्रपती येओल यांनी जाहीर केलं.AFP ने दिलेल्या वृत्तानुसार राष्ट्रपतींनी आणीबाणी जाहीर केल्यानंतर विरोधी पक्ष असलेल्या डेमोक्रेटिक पक्षाने त्यांच्या सदस्यांची एक तातडीची बैठक बोलावली आहे. राष्ट्रपतींनी जी घोषणा केली त्यानंतर सरकार आता काय काय नियम लादू शकते किंवा कशावर बंदी आणली जाऊ शकते या संदर्भात या बैठकीत चर्चा झाल्याचं समजतं आहे.

### घोषणा म्हणजे नियमबाह्य

.दक्षिण कोरियात ही आणीबाणी लादली गेली आहे असं विरोधी पक्षाने म्हटलं आहे.दक्षिण कोरियाचे विरोधी पक्षातील नेते ली जे म्युंग यांनी म्हटलं आहे की राष्ट्रपतींनी दक्षिण कोरियात केलेली मार्शल लॉची घोषणा म्हणजेच आणीबाणीची घोषणा ही नियमबाह्य आहे. दुसरीकडे सत्ताधीश असलेल्या पीपल्स पॉवर पार्टीचे प्रमुख हान डोंग हून यांनीही आणीबाणीचा निर्णय जाहीर करणं चुकीचं असल्याचं म्हटलं आहे. तसंच आम्ही लवकरच हा निर्णय बदलू असंही जाहीर केलं आहे. असोसिएट प्रेसने हे वृत्त दिलं आहे.

# जुनैदच्या हिरोईनने आमिर खानला ओळखलंच नाही

अभिनेत्री शालिनी पांडेने नुकताच आमिर खानचा मुलगा जुनैद खानबरोबर 'महाराज' या चित्रपटात काम केले. या सिनेमातून जुनैदने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. अलीकडील एका मुलाखतीत शालिनीने आमिर खानशीसंबंधित एक गमतीशीर घटना सांगितली. यात तिने आमिर खानलाच ओळखले नाही असे सांगितले. 'बॉलीवूड हंगामा'च्या अभिनेत्रींच्या राऊंडटेबल मुलाखतीदरम्यान शालिनीने 'महाराज' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान जुनैद खानशी झालेल्या मैत्रीविषयी सांगितले. या चित्रपटाच्या यशानंतर घडलेल्या एका मजेशीर प्रसंगाची आठवण सांगताना तिने आमिर खानच्या मेसेजचा किस्सा उलगडला. चित्रपटाच्या यशानिमित्त आयोजित पार्टीसाठी आमिरने तिला आमंत्रित करण्यासाठी मेसेज केला होता. मात्र, त्यांच्या संभाषणात अशी एक गंमत घडली की, सुरुवातीला शालिनीला हा मेसेज आमिर खानचाच असल्याचे लक्षातच आले नाही!या मुलाखतीत हा प्रसंग आठवत शालिनी म्हणाली, "मी तुम्हाला एक मजेशीर गोष्ट सांगते. मी काहीच दिवसांपूर्वी जुनैदबरोबर एका सिनेमात काम केलं आहे,



त्यामुळे तो माझा चांगला मित्र आहे. आम्ही एका पार्टीला जायचं ठरवलं होतं. तेव्हा मला आमिर सरांचा मेसेज आला, 'तू पार्टीला येणार का?' मी विचारलं, 'कोण बोलतंय?' त्यावर ते म्हणाले, 'जुनैदचा बाबा.' मी परत विचारलं, 'कोण जुनैदचा बाबा?' आणि मग ते म्हणाले, 'आमिर खान!'"शालिनीने सांगितले की, तिला समोरचा माणूस सुपरस्टार आमिर खान बोलतोय हे समजायला थोडा वेळ लागला. मात्र, आमिरने या संभाषणादरम्यान सुपरस्टारचा आव न आणता तिच्याशी साधेपणाने संवाद साधला . शालिनी पुढे म्हणाली, "मी त्यांना लगेच म्हटलं, 'सॉरी, सर!' ते जोरजोरात हसू लागले आणि म्हणाले, 'नाही, नाही... मी तुझा काका आहे, मी जुनैदचा बाबा आहे!' काही क्षणांसाठी मला खरंच विसर पडला होता की, जुनैदचे बाबा म्हणजे आमिर खान आहेत!"

## "कसे आहात पुणेकर?

पंजाबी प्रसिद्ध गायक दिलजीत दोसांझ आणि त्याच्या लाइव्ह कॉन्सर्टची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. त्याची 'दिल-ल्यूमिनाटी टूर २०२४' जगभरात सुरू आहे. या माध्यमातून भारतात विविध ठिकाणी दिलजीतचे कॉन्सर्ट होतं आहेत. भारतात दिल्लीपासून 'दिल-ल्यूमिनाटी टूर २०२४'मधील कॉन्सर्टची सुरुवात झाली. त्यानंतर जयपूर, हैदराबाद आणि लखनऊ या ठिकाणी दिलजीतचा जबरदस्त परफॉर्मन्स पाहायला मिळाला. नुकताच दिलजीतचा पुणे येथे लाइव्ह कॉन्सर्ट पार पडला. या कॉन्सर्टमधील अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.दिलजीत दोसांझचा पुण्यातील लाइव्ह कॉन्सर्टची खूप चर्चा झाली. कोथरुड परिसरात रविवारी सायंकाळी झालेल्या दिलजीतच्या कॉन्सर्टला राजकीय पक्षांसह संस्था, संघटनांनी तीव्र विरोध केला. संस्कृती बिघडवणारा कार्यक्रम रद्द करा, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिल्या.

## आरोग्य कसं सांभाळावं

अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या घरावर आणि ऑफिसवर काही दिवसांपूर्वीच ईडीकडून धाड टाकण्यात आली. ईडीने धाड टाकल्याने शिल्पाच्या अडचणी वाढल्या आहेत. अशात नुकतीच तिने इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. ईडीची धाड पडल्यानंतर अभिनेत्रीची ही पहिलीच पोस्ट आहे. यामध्ये तिने छापेमारीबद्दल स्पष्टपणे कोणतंही भाष्य केलेलं नाही. मात्र, या घटनेनंतर आपलं मानसिक आरोग्य कसं सांभाळावं आणि स्वत:ची काळजी कशी घ्यावी यावर अभिनेत्रीने पोस्ट लिहिली आहे.शिल्पाने आठवड्याची सुरुवात करताना इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. व्हिडीओ पोस्ट करत तिने यावर कॅप्शनही लिहिलं आहे. कॅप्शनमध्ये अभिनेत्रीने योग करणे किती महत्वाचे आहे हे सांगितलं आहे. तसेच तिने यात योग केल्याने आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला काय फायदा होतो, याचीही माहिती सांगितली आहे.व्हिडीओच्या कॅप्शनध्ये शिल्पाने लिहिलं की, "स्पाइनल वेव्ह फ्लो आपल्या मणक्यातील अडथळे सोडण्यासाठी काम करते. याने मज्जासंस्थेला आराम मिळतो. याने तुमच्या शरीरालाही आराम मिळतो, तसेच तुम्हाला तणावमुक्त आणि प्रोत्साहित राहण्यासाठी मोठी मदत होते. योग तुमच्या जीवनात फलदायी ठरतो.



## श्रद्धा कपूरने भाड्याने घेतलं अपार्टमेंट

२०१० मध्ये 'तीन पत्ती' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी श्रद्धा कपूरआहेत. गेल्या १५ वर्षांपासून श्रद्धा कपूर आपल्या दमदार अभिनयाने बॉलीवूडवर अधिराज्य गाजवत आहे. अभिनेते शक्ति कपूर आणि शिवांगी कोल्हापुरी यांची ही लाडकी लेक बॉलीवूडची आघाडी अभिनेत्री झाली आहे. ऑगस्ट महिन्यात प्रदर्शित झालेल्या तिच्या 'स्त्री २' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला. ८०० कोटींहून अधिक पैसे कमावणाऱ्या 'स्त्री २' चित्रपटाच्या यशाचा आनंद श्रद्धा कपूर घेत आहे. अशातच तिने जुहूमध्ये आलिशान महागडं अपार्टमेंट भाड्याने घेतल्याचं समोर आलं आहे.



## अभिषेक आला, करीनाची गळाभेट घेतली

बॉलीवूडची बेबो नेहमी चर्चेत असते. अभिनय, सौंदर्या व्यतिरिक्त तिच्या हावभावाचे वेगळे चाहते आहेत. करीनाच्या वेगवेगळ्या हावभावाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यात अजून एका व्हिडीओची भर पडली आहे. एका पुरस्कार सोहळ्यामधील करीना कपूरच्या एका व्हिडीओने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. करीना कपूर आणि अभिषेक बच्चन यांनी बॉलीवूडमध्ये करिअरची एकत्र सुरुवात केली होती. २०००मध्ये प्रदर्शित झालेल्या 'रिफ्यूजी' चित्रपटाच्या माध्यमातून करीना आणि अभिषेकने झगमगत्या दुनियेत पाऊल ठेवलं. त्यानंतर बऱ्याच चित्रपटात दोघं एकत्र पाहायला मिळाले. पण गेल्या काही वर्षांपासून करीना आणि अभिषेकने एकत्र काम केलं नाही. नुकत्याच झालेल्या फिल्म फेअर ओटीटी पुरस्कार सोहळ्यात दोघं एकत्र पाहायला मिळाले. याच पुरस्कार सोहळ्यातील करीना आणि अभिषेकचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. फिल्म फेअरच्या ओटीटी पुरस्कार सोहळ्यात करीनला 'जाने जा' या चित्रपटातील कामासाठी गौरविण्यात आलं. यावेळी अभिषेक बच्चनने तिला पुरस्कार प्रदान केला. यावेळी करीनाने खूप सुंदर साडी नेसली होती. याच पुरस्कार सोहळ्यात अभिषेकने करीनाला गळाभेट करून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर तो विजय वर्माला शुभेच्छा देण्यासाठी पुढे गेला. तेव्हा करीराने डोळे फिरवले. तिच्या या हावभावाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.करीना कपूरच्या या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. ज्युनिअर बच्चनला भेटून बेबोला आनंद झाला नाही, त्यामुळे ती चिडचिड करताना दिसत आहे, अशी नेटकऱ्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. करीना आणि अभिषेकचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप चर्चेत आला आहे.

# सूर्या-शिवम आणि शार्दुल चमकले!

## पृथ्वी,श्रेयस आणि रहाणे पुन्हा एकदा फलंदाजीत फ्लॉप ठरले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे यांनी सय्यद मुश्ताक अली टी-20 ट्रॉफीमध्ये चमकदार कामगिरी करत मुंबईच्या सर्व्हिसेसविरुद्धच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. हैदराबादमध्ये मुंबई आणि सर्व्हिसेस आमनेसामने आले होते, ज्यामध्ये सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबेने दमदार फटकेबाजी केली. मात्र, आयपीएल २०२५ च्या लिलावात अनसोल्ड राहिलेल्या शार्दुल ठाकुरने चार विकेट्स घेतल्या. परंतु पृथ्वी शॉने पुन्हा निराश केली.**





या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मुंबईने लवकरच खाते न उघडता बाद झालेल्या पृथ्वी शॉच्या रुपाने पहिली विकेट गमावली. त्याचवेळी कर्णधार श्रेयस अय्यर आणि अजिंक्य रहाणे यांनाही छाप पाडता आली नाही आणि दोघांनीही अनुक्रमे २० आणि २२ धावा केल्या. यानंतर टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे भाग राहिलेले सूर्यकुमार आणि शिवम यांनी चौथ्या विकेटसाठी १३० धावांची भागीदारी केली, ज्यामुळे मुंबईला चार बाद १९१ धावा करण्यात यश आले. प्रत्युत्तरा दाखल सर्व्हिसेस संघ १९.३ षटकांत १५३ धावांवर गारद झाला.सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबेने मुंबईच्या डावाची धुरा सांभाळली आणि सातत्याने मोठे फटके मारत संघाला संकटातून सोडवले. सूर्यकुमारने ४६ चेंडूंत सात चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ७० धावा केल्या, तर शिवमने ३६ चेंडूंत दोन चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने नाबाद ७१ धावा केल्या. विशेष म्हणजे आयपीएल २०२५च्या मेगा लिलावापूर्वा सूर्यकुमारला मुंबई इंडियन्सने १६.३५ कोटी रुपयांत कायम ठेवले होते, तर चेन्नई सुपर किंग्जने शिवम दुबेला १२ कोटी रुपयांत संघात कायम ठेवले होते.सूर्यकुमार यादव बहिणीच्याल लग्नानंतर दोन आठवड्यांच्या विश्रांतीनंतर मैदानात परतला. सूर्यकुमार स्पर्धेतील उर्वरित सामने खेळणार असून २१ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफी वनडे स्पर्धेतही तो सहभागी होणार असल्याचे मानले जात आहे. सूर्यकुमारने अलीकडेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारतीय संघाची धुरा सांभाळली आणि भारताने चार सामन्यांची मालिका ३-१ अशा४ फरकाने जिंकली. त्या दौऱ्यात शिवम दुबे भारतीय संघाचा भाग नव्हता.सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत ई गटात समाविष्ट असलेल्या मुंबईने तीनपैकी दोन सामने जिंकले आहे. मुंबईचे असून दोन सामने बाकी आहेत. भारतीय संघातील अनेक स्टार खेळाडू या स्पर्धेत खेळत आहेत, ज्यात हार्दिक पंड्या, श्रेयस, तिलक वर्मा, रिंकू सिंग, युजवेंद्र चहल, वरुण चक्रवर्ती आणि इतर खेळाडूंचा समावेश आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी सूर्यकुमार रणजी ट्रॉफीमध्येही खेळला होता. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मुंबईने लवकरच खाते न उघडता बाद झालेल्या पृथ्वी शॉच्या रुपाने पहिली विकेट गमावली. त्याचवेळी कर्णधार श्रेयस अय्यर आणि अजिंक्य रहाणे यांनाही छाप पाडता आली नाही आणि दोघांनीही अनुक्रमे २० आणि २२ धावा केल्या. यानंतर टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे भाग राहिलेले सूर्यकुमार आणि शिवम यांनी चौथ्या विकेटसाठी १३० धावांची भागीदारी केली, ज्यामुळे मुंबईला चार बाद १९१ धावा करण्यात यश आले. प्रत्युत्तरा दाखल सर्व्हिसेस संघ १९.३ षटकांत १५३ धावांवर गारद झाला.सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबेने मुंबईच्या डावाची धुरा सांभाळली आणि सातत्याने मोठे फटके मारत संघाला संकटातून सोडवले. सूर्यकुमारने ४६ चेंडूंत सात चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ७० धावा केल्या.

### शिवमने नाबाद 71 धावा केल्या

शिवमने ३६ चेंडूंत दोन चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने नाबाद ७१ धावा केल्या. विशेष म्हणजे आयपीएल २०२५च्या मेगा लिलावापूर्वा सूर्यकुमारला मुंबई इंडियन्सने १६.३५ कोटी रुपयांत कायम ठेवले होते, तर चेन्नई सुपर किंग्जने शिवम दुबेला १२ कोटी रुपयांत संघात कायम ठेवले होते.सूर्यकुमार यादव बहिणीच्याल लग्नानंतर दोन आठवड्यांच्या विश्रांतीनंतर मैदानात परतला. सूर्यकुमार स्पर्धेतील उर्वरित सामने खेळणार असून २१ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफी वनडे स्पर्धेतही तो सहभागी होणार असल्याचे मानले जात आहे. सूर्यकुमारने अलीकडेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारतीय संघाची धुरा सांभाळली आणि भारताने चार सामन्यांची मालिका ३-१ अशा४ फरकाने जिंकली.

---

# यशस्वी जैस्वाल अडकला काचेच्या दारात

## रोहित शर्मा रोहित-शुबमन गिलने मदत करण्याऐवजी केली टिंगल

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत आणि ऑस्ट्रेलिया याच्यातील दुसरा कसोटी ६ डिसेंबरपासून खेळला जाणारा आहे. या सामन्यात भारतीय संघ ॲडलेडला रवाना झाला. मात्र, विमानतळावर युवा सलामी फलंदाज यशस्वी जैस्वाल प्रतिबंधित क्षेत्रात गेल्यावर काचेच्या दारात अडकला, तेव्हा शुबमन गिल आणि कर्णधार रोहित शर्माने त्याला मदत करण्याऐवजी त्याची मजा केली. ज्याचा व्हिडीओ बीसीसीआयने सोशल मीडियावर शेअर केला आहे.**



ज्यामध्ये भारताने २९५ धावांनी विजय मिळवला होता आणि आता मालिकेतील दुसरा कसोटी सामना ६ डिसेंबरपासून ॲडलेड ओव्हल मैदानावर खेळवला जाणार आहे. पहिली कसोटी संपल्यानंतर, भारतीय संघ कॅनबेरा येथे दोन दिवसीय दिवस-रात्र सराव सामना खेळला आणि २ डिसेंबर रोजी संघ कॅनबेराहून ॲडलेडला पोहोचला.यादरम्यान यशस्वी जैस्वाल काचेच्या दारात कैद झाला. यानंतर शुबमन गिल आणि रोहितने त्याची मजा घेतली. शुबमन गिल म्हणाला की, दोघेही पर्थ कसोटी सामना खेळू शकले नव्हते. रोहित १५ नोव्हेंबरला दुसऱ्यांदा वडील झाला आणि त्यामुळे तो पहिल्या कसोटी सामन्यासाठी निवडीसाठी उपलब्ध नव्हता आणि त्याच्या जागी जसप्रीत बुमराहने संघाची धुरा सांभाळली, तर दुसरीकडे शुबमन गिल बोटाच्या दुखापतीमुळे पहिला कसोटी सामना खेळू शकला नव्हता. मात्र, तो दुसऱ्या कसोटीपूर्वी तो पूर्णपणे तंदुरुस्त दिसत होता आणि त्याने दोन दिवसीय सराव सामन्यात अर्धशतक झळकावले.

### दुसरा कसोटी सामना 6 डिसेंबरपासून

ज्यामध्ये भारताने २९५ धावांनी विजय मिळवला होता आणि आता मालिकेतील दुसरा कसोटी सामना ६ डिसेंबरपासून ॲडलेड ओव्हल मैदानावर खेळवला जाणार आहे. पहिली कसोटी संपल्यानंतर, भारतीय संघ कॅनबेरा येथे दोन दिवसीय दिवस-रात्र सराव सामना खेळला आणि २ डिसेंबर रोजी संघ कॅनबेराहून ॲडलेडला पोहोचला.यादरम्यान यशस्वी जैस्वाल काचेच्या दारात कैद झाला.